# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

दि.०८/०८/२०२२

**प्रेसनोट**

प्रतिवर्षीप्रमाणे सामाजिक व धार्मिक उत्सव “ गोपाळकाला ” (दहिहंडी) शुक्रवार, दिनांक 19 ऑगस्ट, 2022 रोजी सर्वठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. सर्व गोविंदा पथक ह्या उत्सवात मोठ्या उत्साहाने भाग घेतात. दहिहंडी उत्सवात भाग घेणारे गोविंदा पथक आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक प्रसंगी किंवा उत्सवाच्या वेळी करीत असतात.उत्सवामधील जोखीम व धोका विचारत घेवून गोविंदा पथकात भाग घेणा-या व्यक्तींचे, त्यांचे मंडळ किंवा दुर्घटना घडल्यास त्या संबंधात सदर दुर्घटनाग्रस्त व्यक्तीस विम्याचे (इंश्योरेंस) संरक्षण देण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने गोपाळकाला अपघात विमा योजनेस मंजुरी दिली आहे. **या योजनेअंतर्गत दहीहंडी पथकातील सर्व गोविंदांचा मोफत अपघात विमा वसई विरार महानगरपालिके मार्फत काढण्यात येणार आहे.**

तरी याद्वारे आपणांस सुचित करणेंत येते की, वसई विरार महानगरपालिका हद्दीतील गोविंदा पथकाने महानगरपालिकेशी संपर्क साधून पथकात समाविष्ट गोपाळांचा विमा काढून या योजनेचा लाभ घ्यावा, असे जाहिर आवाहान वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. या योजनेची माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेच्या https://vvcmc.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली आहे.

नागरिकांच्या सोई करिता दिनांक. 09 ऑगस्ट 2022 पासून ते दिनांक. 16 ऑगस्ट 2022 पर्यंत कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी देखील विमा संदर्भात कागदपत्रे सकाळी 10.00 वाजता ते सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, पहिला मजला,मुख्यालय, विरार पूर्व येथे स्वीकारले जातील.

**अधिक माहिती साठी -**
क्रीडा विभाग,महापालिका मुख्यालय,पहिला मजला,विरार पुर्व
कार्यालय संपर्क 0250-2525105

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**